# जिल्हा परिषद भंडारा
## जिल्हा परिषद,भंडारा अंतर्गत अनुसुचित जमाती साठी राखीव गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात
### जाहिरात क्रमांक:- ०२/२०१९ दिनांक :- २७/१२/२०१९

------------------------------

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -२०१८/ प्र.क्रं ३०८/ १६-ब दिनांक २१ डिसेंबर २०१९, व ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रं. संकिर्ण २०१८/प्र.क्रं. २२६/भाग-२ आस्था ८ दिनांक २४ डिसेंबर २०१९ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२१६/(प्र.कै.६५/ १६)/ १३-अ दिनांक १३ जुन २०१८, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र:सीईटी२०१५/प्र.क्र१४९/टीएनटी-१, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१९, , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र:संकिर्ण-२०१८/प्र.क्र३९७/टीएनटी-१, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ मधील विहित तरतुदी आणि निर्देशानुसार जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत अनुसुचित जमाती साठी राखीव शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर २०१९ मधील निर्देशाप्रमाणे सरळसेवेने भरावयाच्या गट क संवर्गातील रिक्त पदे भरती करीता अनुसुचित जमाती जातीदावा वैद्यता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. खाली नमुद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विहित अर्हताधारक पात्र उमेदवारांनी अर्ज शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद भंडारा या कार्यालयात विहित मुदतीत पोहचतील या पध्दतीने सादर करावे.

जिल्हा परिषद भंडारा भरती जाहिरात २०१९ ची सविस्तर माहिती www.bhandara.gov.in व www.bhandarazp.org.in. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**अर्ज करण्याची पध्दत**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. | |
| २ | पात्र उमेदवारांना अर्जाचा नमुना www.bhandara.gov.in व www.bhandarazp.org.in या संकेतस्थळाव्दारे उपलब्ध आहे. | |
| ३ | अर्ज स्विकारण्याचा दिनांक - दि ३०/१२/२०१९ पासुन | |
| ४ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक – दि ०६/१/२०२० सायं.५.३० वाजेपर्यंत | |
| ५ | पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे दिनांक – १३/०१/२०२० | |
| ६ | तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करणे दिनांक – १७/०१/२०२० | |
| ७ | दस्ताऐवज पडताळणी दिनांक दिनांक – २१/०१/२०२० | |

**परीक्षा शुल्क डि.डि स्वरुपात-**

| | | |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | रु.१५०/- |

उमेदवारांनी जाहिरातीत नमुद संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचून आपले आवेदन अर्ज **शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद भंडारा** या पत्यावर सादर करावेत.

सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया स्थगित करणे किंवा रद्य करणे, परीक्षेचा प्रकार,(सामाजिक अथवा समांतर आरक्षणात अंशत:/पुर्णत: बदल करणे, संवर्गनिहाय एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी भंडारा आणि नियुक्ती प्राधिकरण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांना असतील. प्रशासकिय कारणांमुळे जाहिरातीत नमुद पदे कमी किंवा जास्त होऊ शकतात. त्याबाबत उमेदवारास अथवा इतर कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.

**जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत अनुसुचित जमाती राखीव पदाकरिता विशेष सरळसेवा भरती २०१९ अन्वये भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | प्रवर्ग | पदनाम | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | अनाथ | समांतर आरक्षणाव्तीरिक्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | अनुसूचित जमाती | प्राथमिक शिक्षक इ. (१ ते ५) | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०३ | १२ |
| **२** | | पदविधर शिक्षक इ. (६ ते ८) | ०६ | ०३ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०६ | १९ |
| | दिव्यांग | | अस्थिव्यंग - ०१ | | | | | | | | ०१ |
| **एकूण रिक्त पदे** | | | **१०** | **०५** | **०३** | **०२** | **००** | **०२** | **००** | **०९** | **३२** |

**अंत्यत महत्वाची सुचना :- सामान्य** प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी **२०१८**/प्र.क्र. **३०८/२०१९/ १६**-ब दिनांक **२१** डिसेंबर **२०१९** नुसार **अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक** उमेदवारांनीच **सदर परिक्षेकरिता अर्ज करावे. जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत संलग्न नसल्यास अपात्र घोषीत करण्यांत येईल.**

वरील कोष्टकात नमुद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**परिशिष्ठ-अ**

पदनिहाय आवश्यक शैक्षणिक व व्यवसायीक अर्हता

| अ.क्र. | पदाचे नांव | एकत्रित मानधन | शैक्षणिक व व्यवसायीक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शिक्षक (इ.१ ते ५) | रु.६०००/- | मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परिक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची दोन वर्षाची प्राथमिक शिक्षण शास्त्र पदविका परिक्षा उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव असो)<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परिक्षा उत्तीर्ण आणि ४ वर्षाची प्राथमिक शिक्षणातील (B.El.Ed.) परिक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परिक्षा उत्तीर्ण आणि दोन वर्षाची प्राथमिक शिक्षण शास्त्र पदविका परिक्षा (विशेष शिक्षण) राष्ट्रिय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्रप्त संस्थ्ेतून उत्तीर्ण<br>**किंवा**<br>राष्ट्रिय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतुदीनुसार मान्यताप्रप्त मंडळाची किमान ४५% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परिक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षण शास्त्र दोन वर्षाची पदविका परिक्षा (D.T.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव असो)<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी परिक्षा मंडळाची किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण आणि राष्ट्रिय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्रप्त संस्थ्ेतून बी.एड. परिक्षा उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>TCH (**महाराष्ट्र – कर्नाटक सीमावर्ती भागातील ८६५ गांवातील उमेदवार संदर्भात कर्नाटक राज्याची TCH परिक्षा उत्तीर्ण** )<br>(**टिप** : जे उमेदवार बी.एड. ही पात्रता पुर्ण करत असतील त्यांचा विचार नियुक्तीसंदर्भात इयत्ता १ ली ते ५ वीच्या वर्ग अध्यापनासाठी शिक्षक म्हणून |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करण्यात येईल. तथापी, त्यांनी सहा महिन्यांचा राष्ट्रिय अध्यापक शिक्षण परिषदेचा शिक्षणशास्त्रातील अभ्यासक्रम Bridge course पूर्ण केलेला असणे बंधनकारक आहे) |
| **परिशिष्ठ-ब** | | | |
| २ | पदविधर शिक्षक (इ.६ ते ८) | रु.६०००/- | मान्यताप्राप्त विद्यापिठाची संबंधित विषयातील पदवी परिक्षा किंवा सामान्य पदवी परिक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची दोन वर्षाची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परिक्षा (बी.एड.) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड. (विशेष शिक्षण) राष्ट्रिय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्रप्त संस्थ्ेतून उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>राष्ट्रिय शिक्षक परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापिठाची संबंधित विषयातील किमान ४५% गुणांसह पदवि परिक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षाची पदवी (बी.एड.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नांव असो.)<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष ) परिक्षा उत्तीर्ण आणि संबंधित विषयातील ४ वर्षाची प्राथमिक शिक्षण शास्त्र पदवी परिक्षा (B.El.Ed) उत्तीर्ण किंवा ४ वर्षाची B.A.Ed. (किंवा समकक्ष ) परिक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थ्ेतून उत्तीर्ण. |

**<u>वरील पदासाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.</u>**

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| १) | अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) | अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परिक्षा देणे बंधनकारक राहील.<br>अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या आधारे उमदवाराची निवड करण्यात येईल |
| २) | शिक्षक पात्रता परिक्षा (TET) | शिक्षक पात्रता परिक्षा (TET) पात्र होणे बंधनकारक राहील.<br>महाराष्ट्र शिक्षक पात्रता परिक्षा किंवा केंद्रीय शिक्षक पात्रता परिक्षेच **पेपर क्रमांक १ (प्राथमिक शिक्षक १ ते ५ करीता) व पेपर क्रमांक २ (पदविधर शिक्षक ६ ते ८ करीता)** मध्ये पात्र असने आवश्यक राहील. |
| ३) | संगणक अर्हता :- | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस२०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४.२.२०१३ व शासन पुरकपत्र क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९ दिनांक ८.१.२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे. |
| ४) | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. |

**(२) निवडीची कार्यपध्दती**

शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन निर्णय दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१९ नुसार शिक्षक संवर्गातील पदे भरतांना खालील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

१. प्राथमिक शिक्षक पदांकरीता उमेदवारांची निवड करातांना अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परिक्षेमध्ये प्राप्त सर्वोच्च गुणांच्या आधारे उमदवाराची निवड करण्यात येईल

(३) सर्वसाधारण सुचना

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक |
| क) जात वैधता प्रमाणपत्र असावा | प्रमाणपत्र आवश्यक |
| ड) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. मकसी१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुण्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल. |

**(४) वयोमर्यादा**

**अ)**

I) उमेदवाराची विहित वयोमर्यादा अर्ज करण्याचा अंतिम दिनांक - दि.०६/०१/२०२० रोजीचे वय विचारात घेऊन गणले जाईल.

II)अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास उमेदवारांचे वय १८ पेक्षा कमी नसावे.

III)अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक - दि.०६/०१/२०२० रोजी उमेदवारांचे वय ४३ वर्ष पेक्षा जास्त नसावे.

**या शिवाय विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.**

| **(५) अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :-** | |
|---|---|
| १) | सदर पदाकरिता अर्ज उमेदवारांने स्वहस्ताक्षरात भरलेला असावा. अर्जाच्या लिफाप्यावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे. त्या पदाचे नांव ठळक अक्षरात नमुद करावे. जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ते दिनांक ०६/०१/२०२० पर्यत सायंकाळी ०५.३० वाजे पर्यत अर्ज पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष स्विकारण्यांत येतील. तदनंतर पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. |
| २ | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. उमेदवाराने अली कडील पासपार्ट साईज छायाचित्र (फोटोग्राफ) आवेदनअर्जासह सादर करणे आवश्यक आहे. |
| ४ | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी. |
| ५) | उमेदवाराने आवेदन अर्ज करण्यापूर्वी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. आवेदनअर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी . |
| ६) | तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, माजी सैनिक, अंशकालीन, प्रकल्पग्रस्त, खेळाडू अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास वैद्यकिय प्रमाणपत्रासह) या संबंधीची माहिती द्यावी लागेल. |
| ७ | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक व व्यावसायीक माहिती भरावी. शैक्षणिक व |

| | |
|---|---|
| | व्यावसायीक पात्रते बाबत जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तसेच पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक ती शैक्षणिक व व्यावसायीक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणास त्यापदासाठी अर्ज करता येईल. |
| ८ | **शुल्क**- उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून **अर्ज करावा. मागासवर्गीय उमेदवारांनी शुल्क डी.डी. (DEMAND DRAFT) राष्ट्रीयकृत अथवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मधुन शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद भंडारा यांचे नावे काढण्यांत येवुन अर्जासोबत जोडावे. त्याशिवाय अर्ज विचारात घेण्यांत येणार नाही. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. परिपूर्ण अर्जासोबत शुल्क डि.डी स्वरुपात जोडण्यांत यावा. माजी सैनिक यांना शुल्क सुट राहिल.** |

| | |
|---|---|
| **(६) अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-** | |
| १) | नोंद : उमेदवाराने आपल्या अर्जाची सत्यप्रत संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वतःजवळ ठेवावी. |
| **(७) महत्त्वाच्या सूचना:** | |
| १) | १) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने **एका पदासाठी, एकापेक्षा अधिक** अर्ज केलेले आहेत असे आढळून आले, तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>२) उमेदवाराने भरणा केलेले शुल्क कोणत्याही परिस्थिती मध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही. |
| २) | उमेदवारास हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. |
| ३) | उमेदवारांना कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. |
| ४) | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| ५) | उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल. |
| ६) | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल. |
| ७) | फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद भंडारा या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. |
| ८) | निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य काही कारणामुळे विहित दिवशी दस्ताऐवज तपासणी शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी तपासली जातील. |
| ९) | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| १०) | **मूळ कागदपत्रांची छाननी अंती व आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.** |
| ११) | आवेदन अर्ज भरतांना उमेदवारांना सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करने बंधनकारक आहे. ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अर्ज करु नयेत. |

| (८) **विशेष सुचना** | | |
|---|---|---|
| | १) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/१००५/१२६ सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दि.०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने दिनांक ०१.०४.२०१५ पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९७४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. | |
| | २) माजी सैनिकासाठी असलेल्या पदांवर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षीत असलेली पदे भरती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णय यानुसार कार्यवाही करण्यात येईल. | |
| | ३) खेळाडू/महिला/प्रकल्प ग्रस्त/ भंकुपग्रस्त पदवीधर अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण ( समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार होवू शकेल. | |
| | ४) निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकिय सोय विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल. | |
| | ५) सुचना या केवळ संकेत स्थळावरूनच उपलब्ध करण्यात येणार असल्याने उमेदवारांनी सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. | |
| | ६) सदर पदभरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परीपत्रक/अधिसुचना यानुसार बदल होवू शकतो. | |

**(९) इतर सर्वसाधारण सुचना**

| | | |
|---|---|---|
| | **१)** ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या अर्ज करणे व शुल्क भरणे आवश्यक राहील (माजी सैनिकांना शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही. | |
| | **२)** अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. | |
| | **३) सामान्य** प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी **२०१८**/प्र.क्र. **३०८/२०१९/१६**-ब दिनांक **२१** डिसेंबर **२०१९** नुसार **अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक** उमेदवारां**नीच सदर परिक्षेकरिता अर्ज करावे. जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत संलग्न नसल्यास अपात्र घोषीत करण्यांत येईल.** | |
| | ४) शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. | |
| | **५)** आवेदन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर | |

| | | |
|---|---|---|
| | प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. | |
| | **६)** निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल, व शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. | |
| | **७)** चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. | |
| | **८)** निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे आवश्यक राहील. | |
| | **९)** अपरिहार्य कारणास्तव किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास निवडीची कार्यवाही करण्यात न आल्यस शासन ठरवून देईल त्या प्रमाणे सोईच्या दिवशी निवडीची कार्यवाही करण्यात येईल. या बाबत वृत्तपत्राव्दारे/संकेतस्थळावर/मोबाईल एसएमएसव्दारे उमेदवारांना कळविण्यात येईल. | |
| | **१०)** कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. | |
| | **११)** निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्य करण्यात येईल. | |
| | **१२)** वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहील. | |
| | **१३)** जाहिराती मधील काही मुद्ये शासन निणर्याच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. | |
| | **१४)** शासन सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र.प्रानिमं-२०१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ५.१०२०१५ मधिल तरतुदी नुसार अभियोग्यता व बुध्दीमता चाचणीत (TAIT) परिक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवरांचा गुणवत्ता यादीत समावेश करतांना आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य देण्याचा शासनाच्या धारणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतक-याचा पाल्य म्हणुन पात्र ठरविण्या बाबतचा पुरावा सांक्षाकित प्रतिसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. | |

| | | |
|---|---|---|
| | **१५)** शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र:सीईटी२०१५/प्र.क्र१४९/टीएनटी-१, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१९ व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र:संकिर्ण-२०१८/ प्र.क्र३९७ / टीएनटी-१, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ मधील विहित तरतुदी बंध्नकारक राहतील. | |
| | **१६)** शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र:राक्रीधो-२००२/प्र.क्र६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१ जुलै, २०१६ मधील विहित तरतुदी बंध्नकारक राहतील. | |

स्वाक्षरी/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद भंडारा

स्वाक्षरी/-
अध्यक्ष जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी भंडारा